
ISSN 2321-9572

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक- वर्ष १ले • अंक ४था • जून - सप्टेंबर -२०१४ • मूल्य १००रु.

*International Level Refered*



• संपादक •

कैलास गणपतराव कानिंदे

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all subjects*

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक • वर्ष 1 ले • अंक 4 था • जून -सप्टेंबर-2014

• संपादक : प्रा. कैलास कानिंदे •

• कार्यकारी संपादक •
डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)
मनोज गिमेकर (भोकर)

• सहसंपादक •

डॉ.सुभाष पवार (अमरावती)
प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)
प्रा.संदिप गोरे (वसमत)
प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)
प्रा. राहुल पंडित (जुन्नर)
प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)
प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)
प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप - कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

"सामाजिक अनुसंधान" हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक, प्रकाशक, संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरीता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशालीनगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून कार्यालय "मुक्ताई निवास", वनक्षेत्र कार्यालयाजवळ, समतानगर,भोकर ता.भोकर जि. नांदेड - 431801. येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| १ | स्वतंत्र मजूर पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी. | प्रा. राहुल पंडित | १ |
| २ | शिवधर्म एक सामाजिक चळवळ | प्रा.तातेराव पवळे | ५ |
| ३ | भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील आव्हान : नक्षलवाद | डॉ. सुभाष के. पवार | १३ |
| ४ | सार्कचे शैक्षणिक कार्य | प्रा. भरत राठोड | १६ |
| ५ | शिक्षण प्रणालीतून मूल्यांचे संवर्धन व संक्रमण. | चित्ररेखा गोणारकर | २१ |
| ६ | १६ वी लोकसभा निवडणूक निकाल एक दृष्टिक्षेप | प्रा. नामदेव बाबुराव डोंगरे | २४ |
| ७ | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक दृष्टिक्षेप | श्री. एस.एन. कसबे | २७ |
| ८ | स्त्रियांविरुध्दचे कुटुंबातर्गत हिंसाचार- एक अभ्यास | योगेश अंबुलगेकर , डॉ. डब्ल्यु.आर.मुज्जावर | ३१ |
| ९ | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय | प्रा.फिसफिसे टी.आर. | ३४ |
| १० | मानवी हक्क आणि महिला विषयक दृष्टिकोन | **कानिंदे के.जी. , प्रा. पंडीत आर. बी.** | ४० |
| ११ | ग्रामीण समुदायाचे नागरी समुदायाकडे होणारे स्थलांतर- एक अभ्यास | योगेश अंबुलगेकर | ४३ |
| १२ | आदिवासींचा धर्म आणि धार्मिक पध्दतीचा अभ्यास | **प्रा.कानिंदे के.जी.** | ४७ |
| १३ | मराठी दलित साहित्यः एक अभ्यास | प्रा. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड | ५० |



Scanned by CamScanner

# मानवी हक्क आणि महिला विषयक दृष्टिकोन

कानिंदे के.जी.
संशोधक विद्यार्थी ,स्वा.रा.ती.म.वि. नांदेड

प्रा. पंडीत आर. बी.
श्री शिवछत्रपती महाविद्यालय,
जुन्नर (पुणे)

## प्रस्तावना

मानवी अधिकाराची संकल्पना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्वाची आहे. मानवी अधिकार ही संकल्पना मानवाच्या जीवनाशी व त्याच्या अधिकाराशी संबंधीत आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांची जोपासना केली जाते. मानवी अधिकार हा जन्म सिध्द हक्क असल्यामुळे तो जन्मताच प्रत्येकाला मिळत असतो. समाजात जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्याचे स्वातंत्र्य दिले जाते. ही संकल्पना संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने डिसेंबर १९४८ रोजी पॅरिस येथे स्विकारलेले वैश्वीक घोषणापत्र आहे.

मानवात वंशिक, जात, धर्म, भाषा, स्त्री-पुरुष अशा भिन्न प्रवृत्ती आढळतात. प्रत्यक्षात स्त्री-पुरुष हे निसर्गाचेच घटक असून समाजाचे ते अत्यावश्यक घटक आहेत. समाजव्यवस्था चालविण्यासाठी या दोन्हींची ही आवश्यकता आहे. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी स्त्रियांची महत्वाची भूमिका आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्क बहाल केले आहे. स्त्रियांचे मानवी हक्क जोपासणे ही गोष्ट समाजाने मनापासून स्वीकारणे आवश्यक आहे. त्यांच्या हक्कावर गदा येईल असे वर्तन नेहमीच निषिद्ध आहे. स्त्रियांनी मानवी हक्क समजून घेवून जागरुकपणे वागणे ही गरजेचे आहे. अजूनही स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते. मानसिक छळ व शारीरिक हिंसाही काहींना सोसावी लागते. त्यावर उपाय फक्त मानवी हक्क आयोगाची सक्रियता आणि अधिकाराच्या कक्षा वाढविल्या पाहीजे.

## मानवी हक्क आणि महिला

समाजात असमानता असणे ही स्वाभाविक बाब आहे. कारण सर्व व्यक्ती समान नाहीत .समाजात जाती, धर्म, लिंग याच्या आधारावर भेदभावपूर्ण व्यवहार केले जातात आणि या भेदभावातूनच वैमनस्य वाढीस लागते. त्यामुळे मानवी अधिकाराचे उल्लंघन होते. अशा प्रकारचा सामाजिक अन्याय लिंगाच्या आधारावर स्त्रीवर केला जातो. माणूस असून ही माणूसकीची वागणूक दिली जात नाही. अशा प्रकारची विषमता समाजात निर्माण झालेली आहे आणि ही विषमता देशापरत्वे वेगवेगळी आहे. विषमता ही लिंग विषमतेशी संबंधीत आहे. त्यामुळे सामाजिक, आर्थिक विषमता निर्माण होते. भारतात लिंगाच्या आधारावरच स्त्री-पुरुष विषमता आहे. समाजातील दर्जा हा लिंगावरच आधारित असल्यामुळे स्त्रीयांना भारतात पितृसत्ताक कुटूंब पध्दती असल्यामुळे स्त्री ही चार भिंतीच्या आत राहणे आणि चूल व मूल यापुरते मर्यादित ठेवले आहे. त्यातूनच स्त्री पुरुष प्रमाण पाहिले तर स्त्रियांची संख्या घटत चाललेली आहे. स्त्रीला लिंगभेद समजून शारिरीक व मानसिक छळाला

सामोरे जावे लागत आहे. स्त्रिला जन्मापासून अनेक समस्यांचा सामना करावा लागत असतो. कारण कुटूंबात जन्माला आलेल्या मुलीला मुलापेक्षा कमी लेखले जाते. मुलगा हा वंशाचा दिवा म्हणून त्याला प्रत्येक बाबतीत स्वातंत्र्य दिले जाते. त्यामुळे स्त्रीयांना अगदी सुरुवातीपासून समस्यांना तोंड द्यावे लागते. हुंडा ही समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. त्यातून शारिरीक व मानसिक छळ वाढत चाललेला आहे. आज बलात्कार, अपहरण, विनयभंग, हुंडा, शारिरीक व मानसिक अत्याचारचा स्त्रीला सामना करावा लागत आहे. त्यामुळे पुरुष प्रधान संस्कृती ही बदलायला हवी. कारण स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्य करु शकते.

महात्मा गांधी स्त्रियांच्या बाबतीत आपले विचार व्यक्त करतांना म्हणतात की, स्त्री आणि पुरुषांना समान मानले पाहिजे आणि स्त्रीसोबत होणाऱ्या भेदभावाच्या विरोधी होते. त्यांनी स्पष्ट म्हटले की, स्त्री ही पुरुषाची सहचरी आहे. त्यांची मानसिक शक्ती पुरुषापेक्षा थोडीही कमी नाहीत. स्त्रीयांना पुरुषाच्या कामात हातभार लावण्याचा अधिकार आहे जितका पुरुषाला आहे. स्त्री ही पुरुषाची दासी नसून बऱ्याच बाबतीत पुरुषापेक्षा ही श्रेष्ठ आहे. ही कल्पना समाजमनात रुजवायला पाहिजे. कारण स्त्री ही कुटूंबामध्ये आहे, पत्नी, बहीण, मुलगी अशा भूमिका वटवित असते. तरी ही स्त्री भ्रूणहत्या वाढत आहे. २० व्या शकतकाच्या प्रारंभी पासूनच महिला लिंगनुपाताचा निरंतर ऱ्हास होत आहे.

आज महिलांच्या मानव अधिकाराचा विचार केला तर त्यांना सुरक्षा पुरवण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात चालू आहे. ०८ मार्च हा विश्वाच्या राष्ट्रीय महिला दिवस म्हणून मानला जात आहे. ही घोषणा ०८ मार्च १९७५ ला झाली आहे. जून १९९३ च्या व्हियन्ना संम्मेलन तथा डिसें १९९३ ला महिलाच्या विरुध्द हिंसेच्या समाप्तीवर संयुक्त राष्ट्र उदघोषणा ही सर्व महिला मानव अधिकाराच्या प्रतिचेतनाचे महत्वपूर्ण उदाहरण आहे. तसेच १९९४ ला स्त्री भ्रूणहत्या कायदा बनवून प्रतिबंधीत केले आहे. महिलाचे यौन शोषण थांबविण्यासाठी संबंधीत कायदा बनवण्यात आला आहे. घरी सुध्दा स्त्री सुरक्षित नाही त्यामुळे २००५ ला कौटुंबिक हिंसा कायदा व संपत्ती मध्ये समान अधिकार दिले आहेत. स्त्रियाच्या समस्याचे मुळ कारण हुंडा असल्यामुळे स्त्रिचा जन्म हा शाप वाटतो. त्यामुळे लिंग परीक्षण करुन हत्या केली जाते. त्यासाठी दुरुपयोग निवारण अधिनियम १९९४ ला ०१ जानेवारी, १९९६ लागू केला.

मुलगी जन्मली तर तिन घालून दिलेल्या बंधनात मुकाट मान खाली घालून याची तजवीज केली जाते. महिलाच्या अनुपस्थितीत कुटूंब आणि समाजाच्या अतिरिक्त कल्पना करु शकत नाही. त्यामुळे थोडे उशीर का होईना पण स्त्रीयांना समानतेची वागणूक मिळत आहे. असे असले तरी स्त्रिचा पती हयात असणे याला सुध्दा समाजात महत्वाचे मानले जाते. अशा स्त्री विधवा म्हणून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी करुन घेत नाही. तसेच विधवेला दुसरे लग्न ही करु



Scanned by CamScanner

देत नाहीत. परंतु काळाच्या ओघात या अटी कुठेतरी शिथिल झालेल्या दिसतात. अनेक क्षेत्रात आजही महिलांना प्रवेश नाही कित्येक ठिकाणी एकाच कामासाठी पुरुष आणि स्त्रीयांना वेगवेगळा मोदबला मिळतो. कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण हा तर स्वतंत्र आणि बैचन करणारा विषय आहे.

लैंगिक शोषणाची तर अनेक रुपे आहेत. त्यात पोटाची खळगी भरण्यासाठी शरीर विकावं लागण्यासारखी नामुष्कीही स्त्रीयांना पत्कारावी लागते. भाजीपाल्यासारख्री त्याची खरेदी विक्री होते आणि अक्षरक्ष: नरकातले जीणे जगावे लागते. बाजारात उभ्या राहाव्या लागणाऱ्या स्त्रियाचे माणूसपणच मुळात नाकारले जाते. तिथे त्यांना मानवी अधिकार आहेत व ते पायदळी तुडविले जात आहेत. याची कोणाला गंधवार्ता असणार. जिथे अन्यायाची परिसीमा तिथे आपल्या संवेदना अशा बोथट झालेल्या असतांना बलात्कारासारख्या घटना या विसरुनच जायच्या असतात वर बलात्कारित बाईलाच दूषणे द्यायची असतात असे संकेत रुळले तर नवल काय आहे.

महिलामध्ये सुधारणा करण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. हिंदू विवाह अधि नियम १९५५ विशेष विवाह अधिनियम १९५४, हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६, हिंदू दत्तक पुत्र अधिनियम १९५६, बाल विवाह प्रतिबंध अधिनियम १९५२, मातृत्व हितलाभ अधिनियम १९७६, समान पारिश्रमिक अधिनियम १९७६, कारखाना अधिनियम १९७६, खान अधिनियम १९५२, द मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगनेंसी ॲक्ट १९७१, हुंडा प्रतिबंध अधिनियम १९६१, अनैतिक व्यापार अधिनियम १९५६, गुन्हेगारी कायद्यात संशोधन १९८३, परिवार न्यायालय, अभ्रद प्रस्तुतीकरण अधिनियम १९८६ सती आयोग १९८७ अशा प्रकारचे अनेक अधिनयम बनवून संविधानाच्या अनुरुप महिलांना समानता देण्याची रुपरेखा तयार केली. १९९१ ला महिला आयोग पास झाला.

सारांश-भारतीय समाजात मानवी अधिकाराची संकल्पना मानली जात असली तरी शासकीय, सामाजिक, राजकीय स्तरावरुन त्याची पायमल्ली करीत आहेत. आपल्या देशात अजूनही मानवी हक्क व कायदे याची अंमलबजावणी समाधानकारकरित्या होत नाही. अजूनही याकडे पूर्ण ग्रहदूषित दृष्टीकोन, वैयक्तिक हेवेदावे, अधिकारासोबत द्वेष, स्वत: केलेल्या चुकावर पांघरुन घालण्यासाठी बळाचा वापर आर्थिक लाभ मिळविणे, राजकीय नेतृत्वांचा दबाव, संबंधीत खात्याचा अविचार, सामाजिक, मानसिक, व्यावसायिक, मानसिक विकृती विकृत समाधान, लैंगिक दुर्बलता, सामाजिक द्वेष, वाढती लोकसंख्या, वाढती गुन्हेगारी अशा प्रकारच्या अनेक कारणांनी मानवी हक्कापासून हे मानवी हक्क वंचित राहत आहे.

**संदर्भसूची**

१. अर्धे आकाश आमचेच आहे ! : दिलीप नलगे - अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर
२. मानव अधिकार की संस्कृति : नंदकिशोर आचार्य, वांग्देवी प्रकाशन बीकानेर
३. स्त्री सुक्त : माधवी कुंटे, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे
४. मानवी हक्क व समाज : नंदकुमार भारंबे, निराली प्रकाशन, पुणे



Scanned by CamScanner